18 JUL 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तर्कतीर्थ हे संवेदनशील बुद्धिवादी

## डॉ. सदानंद मोरे : विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १७ : 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ज्या संवेदनशील वैचारिक भूमिकेतून आयुष्यात विविध स्थित्यंतरे स्वीकारली, ती पाहता ते एक संवेदनशील बुद्धिवादी असल्याचे स्पष्ट होते', असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी आज येथे केले.**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विचार व कार्य' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात बोलताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे. यावेळी डावीकडून डॉ. रणधीर शिंदे, प्रकाश पवार, पी. एस. पाटील, जब्बार पटेल, सुनीलकुमार लवटे उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि वाई येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठानतर्फे 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार व कार्य' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, तर ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल प्रमुख उपस्थित होते.

डॉ. मोरे म्हणाले, 'वैदिक, मार्क्सवाद, गांधीवाद, कॉंग्रेस आणि आधुनिक नवविचार अशी वैचारिक स्थित्यंतरे तर्कतीर्थांनी वेळोवेळी अत्यंत जाणीवपूर्वक स्वीकारली. राजकीय सत्तेचा मोह टाळून विश्वकोश निर्मितीची जबाबदारी स्वीकारून त्यांनी या कार्याला वाहून घेतले, ही बाबही आजच्या काळासाठी आदर्शवत स्वरूपाची आहे. अनेक प्रसंगी सत्यशोधक, ब्राह्मणेतरांच्या प्रागतिक विचारांशी ते एकरूप झाल्याचीही उदाहरणे आहेत. ज्या काळात जो प्रश्न सामोरा आलेला आहे, त्या काळात तो सोडविण्यासाठी शक्य ते सर्व करण्याची तर्कतीर्थांची भूमिका यामागे दिसून येते.'

डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, 'तर्कतीर्थांच्या जीवनकार्याचा वेध घेणारी ही परिषद म्हणजे एक ज्ञानरूपी तीर्थयात्रा ठरली आहे. जब्बार पटेल यांच्या व्यक्तीकेंद्री चित्रपटांचा महोत्सव विद्यापीठात भरविण्यात येईल. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी तर्कतीर्थांविषयी साकारलेला महाप्रकल्प उल्लेखनीय आहे.'

यावेळी डॉ. सुनीलकुमार लवटे, किशोर बेडकीहाळ, डॉ. राजा दीक्षित, संजय ठिगळे, अशोक चौसाळकर, नागोराव कुंभार, ओमप्रकाश कलमे, नामदेव माळी, अविनाश सप्रे आदी उपस्थित होते. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.

दरम्यान, परिषदेत दिवसभरात विविध सत्रांमध्ये डॉ. तारा भवाळकर, विनोद शिरसाट, डॉ. विश्वास पाटील, व्ही. एन. शिंदे, अशोक चौसाळकर, श्रीनिवास हेमाडे, सरोजा भाटे, मिलिंद जोशी, अशोक राणा यांनी तर्कतीर्थांच्या विविध पैलूंचा वेध घेतला.

### तर्कतीर्थांचे तर्क मात्र तेच राहतील


**■ ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी तर्कतीर्थ जोशी यांच्यावर माहितीपट काढला. त्याच्या अनुषंगाने तर्कतीर्थांच्या विविध स्वभावपैलूंचे त्यांनी अतिशय नर्मविनोदी शैलीत निवेदन केले. ते म्हणाले, 'तर्कतीर्थ हे तर्काच्या बाबतीत श्रेष्ठ होते, हे माहिती होते; पण त्याच बरोबरीने त्यांनी विनोदबुद्धिही जपली होती. शास्त्रीजींमध्ये एक उत्तम नटही दडलेला होता. तो या चित्रपटाच्या निमित्ताने मला दर्शकांसमोर आणता आला, याचे समाधान वाटते. अशा स्वरूपाची परिषद दहा वर्षांनी पुन्हा भरवावी. त्यावेळी तर्कतीर्थांवर बोलणारे वक्ते, त्यांची मांडणी, श्रोते आणि पिढ्या बदलतील, मात्र तर्कतीर्थांचे तर्क तेच राहतील.'**

18 JUL 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पिढ्या बदलतील, तर्कतीर्थांचे तर्क तेच राहतील

## जब्बार पटेल : विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावर बोलणारे वक्ते बदललेले असतील, त्यांची मांडणी बदललेली असेल, श्रोते बदललेले असतील. पिढ्या बदलतील, मात्र तर्कतीर्थांचे तर्क तेच राहतील, असा विश्वास ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी गुरुवारी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि वाई येथील तर्कतीर्थ लक्ष्मणसास्त्री जोशी प्रतिष्ठान यांच्या वतीने 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार व कार्य' या विषयावरील दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे प्रमुख पाहुणे, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अध्यक्षस्थानी होते.

डॉ. पटेल म्हणाले, तर्कतीर्थ हे तर्काच्या बाबतीत श्रेष्ठ होते, हे माहिती होते; पण, त्याचबरोबरीने त्यांनी विनोदबुद्धीही जपली होती. या मिश्कील स्वभावाबरोबरच शास्त्रीजींमध्ये एक उत्तम नटही दडलेला होता. तो त्यांच्यावरील चित्रपटाच्या निमित्ताने मला दर्शकांसमोर आणता आला, याचे समाधान वाटते.

डॉ. मोरे म्हणाले, वाईसारख्या कर्मठ ठिकाणी तर्कतीर्थांनी केलेले काम महत्त्वाचे आहे. वैदिक, मार्क्सवाद, गांधीवाद, काँग्रेस, आधुनिक नवविचार अशी वैचारिक स्थित्यंतरे तर्कतीर्थांनी वेळोवेळी अत्यंत जाणीवपूर्वक स्वीकारली. राजकीय सत्तेचा मोह टाळून 'विश्वकोश' निर्मितीची जबाबदारी स्वीकारून त्यांनी या कार्याला वाहून घेतले, ही बाबही आजच्या काळासाठी आदर्शवत स्वरूपाची आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, तर्कतीर्थांच्या जीवनकार्याचा वेध घेणारी ही परिषद म्हणजे एक ज्ञानरूपी तीर्थयात्रा ठरली आहे. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी तर्कतीर्थांविषयी साकार केलेल्या महाप्रकल्पाचीही त्यांनी यावेळी प्रशंसा केली. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले. परिषदेत मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, विनोद शिरसाट, डॉ. विश्वास पाटील यांच्यासह विद्वतजनांनी तर्कतीर्थांच्या विविध पैलूंचा वेध घेतला.

18 JUL 2025

जनसंपर्क कक्ष
लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे संवेदनशील बुद्धिवादी : तारा भवाळकर

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**कोल्हापूर :** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे अनेक विचारधारांच्या जवळ राहिले. यातून त्यांचे विकसनशील व्यक्तिमत्व दिसून येते, असे मत मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा तारा भवाळकर यांनी गुरुवारी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचे 'गांधी अभ्यास केंद्र' आणि वाई येथील 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठान' यांच्या संयुक्त विद्यमाने 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार व कार्य' या विषयावरील दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोप प्रसंगी त्या बोलत होत्या.

तर्कतीर्थ जोशी यांनी ज्या संवेदनशील वैचारिक भूमिकेतून आयुष्यात विविध स्थित्यंतरे स्वीकारली, ती पाहता ते एक संवेदनशील बुद्धिवादी असल्याचे स्पष्ट होते. वाईसारख्या कर्मठ ठिकाणी तर्कतीर्थांनी केलेले काम ऐतिहासिक महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी यावेळी केले.

वैदिक, मार्क्सवाद, गांधीवाद, काँग्रेस आणि आधुनिक नवविचार अशी वैचारिक स्थित्यंतरे तर्कतीर्थांनी वेळोवेळी अत्यंत जाणीवपूर्वक स्वीकारली. राजकीय सत्तेचा मोह टाळून विश्वकोश निर्मितीची जबाबदारी स्वीकारून त्यांनी या कार्याला वाहून घेतले, ही बाबही आजच्या काळासाठी आदर्शवत स्वरुपाची आहे, असे मोरे म्हणाले.

तर्कतीर्थ जोशी यांच्यावर माहितीपट काढणारे ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल म्हणाले, तर्कतीर्थ हे तर्काच्या बाबतीत श्रेष्ठ होते. तद्वत त्यांच्यात त्यांनी विनोदबुद्धी, मिश्कील स्वभावाबरोबरच उत्तम नट कसा दडलेला होता याचे नर्मविनोदी शैलीत वर्णन केले.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, तर्कतीर्थांच्या जीवनकार्याचा वेध घेणारी ही परिषद म्हणजे एक ज्ञानरुपी तीर्थयात्रा ठरली आहे. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी तर्कतीर्थांविषयी साकार केलेल्या महाप्रकल्पाची त्यांनी प्रशंसा केली.

यावेळी अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी, अशोक राणा यांनीही मांडणी केली. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक, प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन, डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.

18 JUL 2025 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तर्कतीर्थ संवेदनशील बुद्धीवादी होते

## डॉ. सदानंद मोरे; विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेची सांगता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ज्या संवेदनशील वैचारिक भूमिकेतून आयुष्यात विविध स्थित्यंतरे स्वीकारली ती पाहता ते एक संवेदनशील बुद्धीवादी असल्याचे स्पष्ट होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि वाई येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार व कार्य' या विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल प्रमुख उपस्थित होते. डॉ. मोरे म्हणाले, वाईसारख्या कर्मठ ठिकाणी तर्कतीर्थांनी केलेले काम ऐतिहासिक महत्त्वाचे आहे. वैदिक, मार्क्सवाद, गांधीवाद, काँग्रेस आणि आधुनिक नवविचार अशी वैचारिक स्थित्यंतरे तर्कतीर्थांनी वेळोवेळी अत्यंत जाणीवपूर्वक स्वीकारली. राजकीय सत्तेचा मोह टाळून विश्वकोश निर्मितीची जबाबदारी स्वीकारून त्यांनी या कार्याला वाहून घेतले, ही बाबही आजच्या काळासाठी आदर्शवत स्वरूपाची आहे.



**कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलताना डॉ. सदानंद मोरे.**

डॉ. पटेल म्हणाले, तर्कतीर्थ हे तर्काच्या बाबतीत श्रेष्ठ होते, हे माहिती होते; पण त्याचबरोबरीने त्यांनी विनोदबुद्धी जपली होती. या मिश्कील स्वभावाबरोबरच शास्त्रीजींमध्ये एक उत्तम नटही दडलेला होता. तो या चित्रपटाच्या निमित्ताने मला दर्शकांसमोर आणता आला, याचे समाधान वाटते. अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, तर्कतीर्थांच्या जीवनकार्याचा वेध घेणारी ही परिषद म्हणजे एक ज्ञानरूपी तीर्थयात्रा ठरली आहे. या परिषदेने त्यांच्या जीवनकार्याकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन प्रदान केला आहे. तर्कतीर्थांचा एकेक पैलू समजून घेण्यास आजच्या पिढीने प्राधान्य दिले पाहिजे, याची जाणीव या निमित्ताने करून दिली आहे.

डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्यासह किशोर बेडकिहाळ, डॉ. राजा दीक्षित, डॉ. संजय ठिगळे, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. नागोराव कुंभार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUL 2025
पुढारी

# डॉ. जब्बार पटेल यांचा आज शिवाजी विद्यापीठात मुक्त संवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग विभागात शुक्रवार, दि. १८ रोजी सकाळी साडेदहा वाजता ख्यातनाम दिग्दर्शक डॉ.



जब्बार पटेल विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधणार आहेत. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असणार आहेत. मास कम्युनिकेशन विभागात हा कार्यक्रम होईल. शिवाजी विद्यापीठात गेल्या वर्षापासून बारावीनंतरचा बी. ए. फिल्म मेकिंग हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमात चित्रपट निर्मितीचे धडे दिले जातात. या विद्यार्थ्यांना तसेच कोल्हापुरातील नाट्य आणि चित्रपट निर्मात्यांना जब्बार पटेल मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांना खुला आहे. पटेल यांच्या मुक्त संवादात चित्रपट आणि नाट्य चळवळीतील लोकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन बी. ए. फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUL 2025
तरुण भारत

# डॉ. जब्बार पटेल यांचा आज विद्यापीठात मुक्त संवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग विभागात १८ रोजी सकाळी साडेदहा वाजता दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी आहेत. मास कम्युनिकेशन विभागात हा कार्यक्रम होईल. शिवाजी विद्यापीठात बारावीनंतरचा बी. ए. फिल्म मेकिंग हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमात चित्रपट निर्मितीचे धडे दिले जातात. या विद्यार्थ्यांना तसेच कोल्हापुरातील नाट्य आणि चित्रपट निर्मात्यांना जब्बार पटेल मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. जब्बार पटेल यांच्या मुक्त संवादात चित्रपट आणि नाट्य चळवळीतील लोकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन बी. ए. फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

18 JUL 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तर्कतीर्थ जोशी हे संवेदनशील बुद्धीवादी

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांचे प्रतिपादन : आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वैचारिक भूमिकेतून आयुष्यात विविध स्थित्यंतरे स्वीकारली. ती पाहता ते एक संवेदनशील बुद्धीवादी असल्याचे स्पष्ट होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि वाई येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित परिषदेत ते बोलत होते. 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार व कार्य' या विषयावरील परिषदेच्या सांगता समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. मोरे म्हणाले, वैदिक, मार्क्सवाद, गांधीवाद, काँग्रेस आणि आधुनिक नवविचार अशी वैचारिक स्थित्यंतरे तर्कतीर्थांनी जाणीवपूर्वक स्वीकारली. राजकीय सत्तेचा मोह टाळून विश्वकोश निर्मितीची जबाबदारी स्वीकारून त्यांनी या कार्याला वाहून घेतले. ही बाब आजच्या काळासाठी आदर्शवत स्वरूपाची आहे. अनेक प्रसंगी सत्यशोधक, ब्राह्मणेतरांच्या विचारांशी ते एकरूप झाले होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे. सोबत डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रकाश पवार, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. जब्बार पटेल, डॉ. सुनीलकुमार लवटे.

### तर्कतीर्थांचे तर्क मात्र तेच राहतील : ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल

तर्कतीर्थ हे तर्काच्या बाबतीत श्रेष्ठ होते. हे माहिती होते, पण त्यांनी विनोदबुद्धीही जपली होती. हे या निमित्ताने अनुभवास आले. या मिश्कील स्वभावाबरोबरच शास्त्रीजींमध्ये एक उत्तम नटही दडलेला होता. तो या चित्रपटाच्या निमित्ताने मला दर्शकांसमोर आणता आला. या चित्रीकरणाचा संपूर्ण अनुभव अत्यंत अविस्मरणीय होता. तर्कतीर्थांवर बोलणारे वक्ते बदललेले असतील. त्यांची मांडणी बदललेली असेल, समोर बसलेले तरुण श्रोते बदललेले असतील. पिढ्या बदलतील, मात्र तर्कतीर्थांचे तर्क तेच राहतील.

अध्यक्षस्थानावरून प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, तर्कतीर्थांच्या जीवनकार्याचा वेध घेणारी ही परिषद ठरली आहे. या परिषदेने त्यांच्या जीवनकार्याकडे पाहण्याचा एक नवा दृष्टीकोन प्रदान केला आहे. तर्कतीर्थांचा एकेक पैलू समजून घेण्यास आजच्या पिढीने प्राधान्य दिले पाहिजे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, 'साधना'चे संपादक विनोद शिरसाट, गांधीवादी विचारवंत डॉ. विश्वास पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, ज्येष्ठ अभ्यासक श्रीनिवास हेमाडे, ज्येष्ठ विचारवंत सरोजा भाटे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलींद जोशी, विचारवंत अशोक राणा, यांनी तर्कतीर्थांच्या विविध पैलूंचा वेध घेतला.

डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुनीलकुमार लवटे, किशोर बेडकीहाळ, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. नामदेव माळी, डॉ. अविनाश सप्रे, डॉ. जी. पी. माळी, डॉ. विश्वास सुतार, डॉ. नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUL 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ८११ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ८११ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी पोस्ट ग्रज्युएट डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी अभ्यासक्रमाची परीक्षा झाली. परीक्षेला २८ विद्यार्थी उपस्थित होते.

दि.१७ रोजी चार अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUL 2025
सकाळ

# पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या फेरीतील 'प्रवेश' सुरू

## अधिविभागांमध्ये ऑफलाईन प्रक्रिया

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठातील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या फेरीतील प्रत्यक्ष प्रवेशाची कार्यवाही आजपासून सुरू झाली. त्यात कॅम्पसवरील अधिविभागांमध्ये विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली. या फेरीतील प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शनिवार (ता. १९) पर्यंत मुदत आहे.

एम.एस्सी., केमिस्ट्री, कॉम्प्युटर सायन्स, मायक्रोबायोलॉजी, जिओग्राफी, एम.एस.डब्ल्यू., बॉटनी, एम.बी.ए., बायोटेक्नॉलॉजी अशा विविध २६ अभ्यासक्रमांच्या काही जागा प्रवेशाच्या पहिल्या फेरीमध्ये रिक्त राहिल्या. त्यावर विद्यापीठाने पुनर्प्रवेश परीक्षा घेतली. त्यासाठी एकूण ११७६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यातील १०४४ जणांनी परीक्षा दिली. या परीक्षेची गुणवत्ता यादी मंगळवारी विद्यापीठाने प्रसिद्ध केली. त्यामध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश निश्चित करण्याची प्रक्रिया आजपासून सुरू झाली. त्यामुळे विद्यापीठ कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांची गर्दी दिसून आली. या फेरीमध्ये काही जागा रिक्त राहिल्या आणि तर संबंधित अधिविभागांच्या मागणीनुसार प्रवेशाची तिसरी फेरी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी या अभ्यासक्रमाची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने एका परीक्षा केंद्रावर झाली. त्यासाठी २८ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विविध चार अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. आजअखेर ८११ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.